# गर्भपाताचें बिल

यासंबंधी पारंपरिक कल्पना सोडून स्वतंत्र विचार उघडपणे मांडणाऱ्या स्त्रिया सांपडणें अर्थांतच कठिण आहे आणि याचें मुख्य कारण त्यांची परंपरागत मानसिक गुलामगिरी आहे. तथापि त्यासंबंधी जें कांहीं बरें वाईट लिहिणें कांही लेखिकांस भाग पडतें, त्यांत भरमसाट विधानें करून तुटपुंज्या ज्ञानाचें प्रदर्शन करण्याचें काय कारण आहे? अशा प्रकारचा एक लेख कु. **पिरोज आनंदकर** यांनी 'प्राविण्य' मासिकांत संपादकीय खुर्चीवरून भरकटला आहे हल्लीचा कायदा काय आहे याची त्यांस धड माहिती नाही. त्या म्हणतात एखाद्या बाईच्या शरीराला जर धक्का पोंचला असेल तर शस्त्रवैद्याकडून गर्भपात करणें गुन्हा नाही. वास्तविक कायदा फार वेगळा आहे. शरीराला कितीहि धक्का पोंचत असला तरी जर मरणाची भीति नसेल तर गर्भपात करण्याचा हक्क हल्ली नाही. पुष्कळ वेळां स्त्रिया यामुळे जन्माच्या रोगी होऊन बसतात, पण मरत नाहीत, यामुळे स्त्री मरणार की काय हें डॉक्टरास पहावें लागतें. नीतीसंबंधी लेखिकेला पारंपारिक मतच पसंत आहे, तें एक असो. तो गुलामगिरीचा परिणाम असला तरी प्रामाणिक मतभेद म्हणतां येईल, परंतु लिहितांना विचार करण्यास त्यांना फुरसत नसते असें दिसतें. त्या म्हणतात, 'भ्रूणहत्या व गर्भपात हे कायद्याने गुन्हे ठरवले असतांहि अनाथबालकाश्रमासारख्या संस्था भरभराटीला येतात.' हें किती हास्यास्पद आहे हें त्यांच्या लक्षांत किंचित विचारानेहि आलें असतें असें वाटतें. हे गुन्हे ठरवल्यामुळेच अशा संस्था लागतात, गर्भपात गुन्हा नसल्यास या संस्थांची जरूरच राहणार नाही. शिवाय, कायद्याने अनीतीला आळा बसत नाही हें स्पष्ट कबूल केल्यावर मग तो बदलल्याने अनीति वाढेल म्हणण्यांत अर्थच रहात नाही. या लेखांत त्यांनी हास्यास्पद विधानांचा बराच संग्रह केला आहे. उदाहरणार्थ, 'आनुवंशिक रोगाने पछाडलेल्या व्यक्तींना विवाहापासून निवृत्त करणें कायद्याचें काम आहे.' त्यांना अजून इतकेंहि माहीत नाही की संतति विवाहावर अवलंबत नाही, आणि

कायद्याचा त्यांत उपयोग नाही. त्यांची अशीही विलक्षण कल्पना आहे की 'ग… पात करणें पापमूलक आहे अशी समजूत बहुजनसमाजाच्या हाडींमासीं खिळले… आहे.' गर्भपाताची माहिती मागवणारीं कित्येक पत्रें आमचे मासिकांत प्रसि… केलेलीं आहेत आणि ही माहिती मागणारांचा प्रवाह आमचेकडे एकसारखा चा… असतो, आणि त्यांत सर्व दर्जाचे लोक असतात. तेव्हा आमच्या वाचकांस त… हें माहित आहे की ही समजूत केवळ बोलण्यापुरती आहे, आचरणांत येत नाह… आणखी एक विलक्षण कल्पना म्हणजे सुशिक्षित व सुधारलेल्या लोकांत प्रजोत्प… कमी होते, याचें कारण 'सुशिक्षिताला आपल्या प्रबल मनोवृत्तीचा ओघ अने… ठिकाणी वळवतां येतो.' इतका भोळसटपणा संपादकांस शोभत नाही. त्यां… सामान्य माहिती असावी अशी अपेक्षा असते. अशा विषयांवर लिहिण्याप… थोड्याशा अभ्यासाची जरूरी असते, केवळ कल्पनेंतून खरी माहिती निघणें श… नसतें. सुशिक्षितांस मुलें कमी होतात याचें एक कारण त्यांची प्रजोत्पादनशक्ती कमी होते व दुसरें कारण संततिनियमनाची साधनें. तीं न वापरल्यास सुशि… तांसही भीक लागते.

हें न समजून संपादिकाबाईंनी जातां जातां संततिनियमनावर शितो… उडवला आहे. त्या म्हणतात, 'आपलें कुटुंबपोषण करण्याची महत्त्वाकांक्ष… कर्तबगारी–आज जी पुरुषांत दिसून येते तिचा संततिनियमनाच्या नांवाखा… लोप होत जाईल.' पुरुषांनी कबाडकष्ट करून पैसे मिळवावे आणि बायक… शक्य तितकीं पोरें उत्पन्न करून त्यांच्या कर्तबगारीला प्रोत्साहन द्यावें, … श्रमविभागाची कल्पना किती घातक आहे हें अर्थशास्त्रज्ञ त्यांस सांगूं शकती… पण तें त्यांस कळेल असें दिसत नाही. त्यांस कळण्यासारखी एकच गोष्ट आम… सांगतों की वरील कल्पना फैलावल्यास स्त्रियांचीं लग्नें होणें अधिकाधिक क… होत जाईल. एखादा पुरुष विवाह करून फसल्यावर स्त्रियांस वरील करा… करून त्यास भीक मागण्याची वेळ आणतां येईल, किंवा त्यास आत्महत्या… करावी लागेल, परंतु अशा विचारांच्या स्त्रियांपासून पुरुषांनी वेळींच सा… रहावें असा आम्ही त्यांस इशारा देतों.

गर्भपाताचें बिल

वरील लेखिकेने पाश्चात्यांना शिव्या देवून लोकप्रियतेच्या धोपट मार्गांचेंहि अवलंबन केलें आहे, आणि अर्थात् मासिकाच्या खपाच्या दृष्टीने तें योग्यच आहे, आणि पाश्चात्य तितकें वाईट समजणारे दुधखुळे वाचकच त्यांस पाहिजे असल्यास आम्ही त्यांस दोषहि देत नाही. स्वातंत्र्याला स्वैराचार म्हणणें हा गुलामगिरीचा स्वाभाविक परिणाम आहे. हिंदुस्थान स्वतंत्र नाही याचेंहि कारण हेंच आहे. स्वातंत्र्याचें महत्वच ज्यांना कळत नाही त्यांना तें मिळणार कसें ? लेखिकेला सर्वांत मोठी भीति वाटते ती अशी की 'हा कायदा कदाचित पास झाला तर कांही दिवसांनी, स्त्रीपुरुषांचा विवाहबाह्य संबंध म्हणजे कायद्याने अनीति ठरत नाही असेहि कायदे पास करून घेण्याचा प्रसंग हिंदी जनतेवर येईल.' ही अज्ञानाची कमाल झाली. 'विवाहबाह्य संबंध' हल्ली देखील कायद्यांत अनीति नाही, फक्त एखाद्या सौ. चा इतर पुरुषांशीं संबंध एवढाच कायद्यांत गुन्हा समजलेला आहे, इतर सर्व प्रकारच्या विवाहबाह्य संबंधांस कायद्याची परवानगी हल्लीच आहे.

कार्यकारणभावाची कल्पनाच ज्यांना नाही त्यांनी युक्तिवादाचा आव आणला म्हणजे मोठी मौज होते. शेवटच्या पॅऱ्यांत लेखिका म्हणते, 'स्त्रीपुरुष व्यक्तींच्या अधःपाताबद्दल (म्हणजे भटांची परवानगी न घेतल्याबद्दल) एकट्या स्त्रीलाच समाजाची छळणूक भोगावी लागते, म्हणून सुज्ञ स्त्रियांनी या कायद्याला पाठिंबा देवूं नये ! ही विचारशक्तीची कमाल आहे ! या कायद्याचा परिणाम जर कांही होणार असेल तर तो हाच की पुरुषांचें 'अधःपतन' जसें कोणास समजत नाही तसेंच स्त्रियांचेंहि समजणार नाही, व त्यांस पुरुषांप्रमाणेच उजळ माथ्याने समाजांत वावरतां आल्यामुळे त्यांची छळणूक होणार नाही. पण इतका विचार कोण करणार ! कागद आहे, शाई आहे, जाधवांच्या बिलाच्या विरुद्ध लिहायचें आहे, असें आधी ठरवून भरमसाट लिहीत सुटण्याचा हा परिणाम आहे. 'प्राविण्य' मासिकाचे संपादक जरी प्रवीण नसले तरी त्यांनी मधून मधून विचार करण्याची संवय ठेवण्यास हरकत असूं नये.

---

# जनावरांची लग्नसंस्था

——=:०*०:=——

ले. वा. रा. कुळकर्णी, बी. एजी.

जीवसृष्टींत मनुष्यप्राणि बुद्धीने श्रेष्ठ आहे. ज्या पाळींव जनावरांसंबंधी मी लिहिणार आहें, त्यांनाहि बुद्धि आहे, परंतु मानसशास्त्राच्या दृष्टीने मनुष्यासंबंधी जितकी माहिती उपलब्ध आहे तितकी त्यांचेविषयीं नाही, आणि म्हणून वधूवरांची निवड करतांना कुल आणि शील या दोन्ही मुद्द्यांस महत्त्व असतां मी फक्त कुलासंबंधी व इतर कांही किरकोळ गोष्टींसंबंधी लिहिणार आहें.

रानटी स्थितींत असतांना या प्राण्यांना एक प्रकारची समाजव्यवस्था होती, परंतु आजच्या परिस्थितींत मनुष्याने आपल्या जरूरीप्रमाणे त्यांचा उपयोग करण्याचें ठरवून कृत्रिम जीवनाने त्यांना तिचा विसर पाडला. आता यांची वधूवरांची निवड केवळ लग्नसंस्थेच्या दृष्टीनेच करणे अर्थशास्त्राच्या दृष्टी रास्त होय.

जननशास्त्र आणि आनुवंशिकत्व हीं आमच्या लग्नसंस्थेचीं शास्त्रें हो पुराण्या कल्पनांचा आधार या संस्थेस घातुक आहे. या शास्त्रग्रंथांतील तत्वें सु एखाद्या तरुण तज्ज्ञाने सप्रमाण चुकीचीं ठरवल्यास तीं आम्हास वेदाज्ञेप्रमा शिरसावंद्य नाहीत. प्रगतिप्रिय पाश्चात्य देशांतील स्वभाषेंत या पोथ्यांच्या प्र वधूवरांच्या पालकांना, म्हणजे शेतकऱ्यांना आणि जनावरांची पैदास करणारां फुकट वांटण्यांत येऊन हें धर्मप्रचाराचें कार्य जोरांत सुरू आहे. तेथील यःकश्चि शेतकरीहि विश्वविद्यालयाचा पदवधिर असतो व त्यामुळे त्याला ह्या वाङ्मयाच सक्रिय उपयोग करून घेतां येतो. ( तिकडील शेतकरी पदवीधर असतात गैरसमज आहे, परंतु तेथे सर्वांसच लिहितांवाचतां येतें. **सं.** )

आपली परिस्थिति फार चमत्कारिक आहे. आमच्या पूर्वजांना किं आज हा धंदा करणारांना या शास्त्रांचा कांहीच गंध नव्हता किंवा नाही अ

नाही, परंतु असलेलें ज्ञान अपुरें; त्यांत धर्मभोळ्या समजुती, जुनें तें सोनें ही अंधश्रद्धा, आणि विज्ञानाऐवजी चुकीच्या समजुती, यांमुळे आपलें फार नुकसान होत आहे. जुनें तें सोनें म्हटलें तरी तें उजळायला हवें आहे, आणि बुद्धीला पटणाऱ्या आणि आर्थिक फायदा करून देणाऱ्या सर्व शास्त्रीय कल्पना उचलण्यास आपण एका पायावर तयार व्हायला हवें आहे. ह्या धंद्यासंबंधी कळकळ बाळगणाऱ्या शास्त्रज्ञांनी व संस्थांनी मातृभाषेंत वाङ्मय निर्माण करून तें प्रसृत करावयास हवें. तें अज्ञ लोकांना समजावून, पटवून दिलें पाहिजे. आणि पटलेलीं तत्त्वें प्रत्यक्ष कृतींत उतरवण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्या देशांत हा धंदा अप्रबुद्ध लोकांचे हातांत आहे आणि म्हणूनच आपल्याला अधिक नेटाने प्रयत्न केला पाहिजे.

स्वेच्छेनुसार उत्तम प्रकारची संतति निर्माण करतां येते हें तत्त्व प्रथम मनावर ठसलें पाहिजे, आणि त्याबरोबरच ही गोष्ट वाटते तितकी सोपी नसून हल्लीच्या पद्धतींत व कल्पनांत संक्रमण झाल्याखेरीज शक्य नाही, हेंहि लक्षांत ठेवावयास हवें. जी प्रजा उत्पन्न होत आहे ती केवळ एका अज्ञात महाशक्तीच्या इच्छेने उत्पन्न होत नसून त्या संततीचे उत्पादक आपण आहोंत आणि आपण उत्पत्तिशास्त्राचें ज्ञान करून घेतल्यास बहुतांशीं आपलें इच्छित ध्येय आपणांस साध्य करून घेतां येईल.

आपणांस कोणत्या प्रकारची प्रजा पाहिजे ही कल्पना निश्चित केल्यानंतरच आपणांस वधुवरांची निवड करतां येईल. येथे हें लक्षांत ठेवावयास हवें की आई-बापांचे ठिकाणीं असलेल्या गुणांचे पलीकडे कांहीहि संततींत उतरणें शक्य नाही. विस्तारभयास्तव येथे इतकेंच सांगतों की आईबापांत असलेले गुण संततीचे ठिकाणीं कांही विशिष्ट नियमानुसार उतरतात व ह्या नियमांचें तात्विक व व्यावहारिक ज्ञान झाल्याखेरीज कोणीही जनावरांची पैदास धंद्याच्या दृष्टीने करूं नये. ती देशाला विघातक होय. याबरून पाहतां सध्या चालू असलेली प्रजोत्पत्ति बुद्धि-पुरःसर नसून कशीतरी चाललेली आहे असें दिसून येईल.

आपल्या जनावरांची कोणत्या बाबतींत सुधारणा होणें इष्ट आहे याचाहि आपण विचार करावयास पाहिजे, आणि प्रजोत्पादनार्थ जनावरांची निवड करतांना कांही गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. त्यांना लवकर ऋतु प्राप्त होऊन त्यांची आयुर्मर्यादा वाढल्यास त्यांचा प्रथम वीतापूर्वीचा जोपासनेचा खर्च कमी होऊन त्यांजकडून अधिक कामगिरी घेतां येईल. त्यांची प्रजा जोमदार निघून अधिक बहुप्रसव झाली पाहिजे, वीतानंतर ती लवकर माजावर आली पाहिजे, दुभत्या गायीह्मशींपासून अधिक दूध व अधिक चरबी मिळणें अवश्य आहे, खाटा काल कमी झाला पाहिजे. कोणतेंहि आर्थिक दृष्टीने ठेवलेलें जनावर म्हणजे एक यंत्र असून त्याची कार्यक्षमता त्याने केलेली कामगिरी व त्याप्रीत्यर्थ करावा लागलेला खर्च यांच्या गुणोत्तरावरून काढतां येईल. शरीराची ठेवण व बांधा याचीहि उपयोगाप्रमाणे सुधारणा केली पाहिजे. शेळीने अधिक दूध दिलें पाहिजे, मेंढरांची लोकर अधिक निघून तींत तलमपणा आला पाहिजे, कोंबड्यांनी अधिक अंडीं घातलीं पाहिजेत. इतर देशांचे मानाने आपली यांत कांहीच प्रगति झालेली नाही. या कार्यांत सरकार व लोक यांनी सहकार्य करून आपले उद्योगधंदे वाढवून आर्थिक आयात वाढवावी. याशिवाय गत्यंतर नाही.

गाई सुधारण्याचा प्रश्न आपलेकडे फार बिकट होऊन बसला आहे. जोंपर्यंत संततीचें नियमन शक्य नाही तोंवर हा असाच गुंतागुंतीचा राहणार. गाई दुधाळ असाव्यात आणि बैल कामाच्या लायकीचे असावे हें इष्ट आहे. एकाच आईबापांची पैदास येणेप्रमाणे दोन्हीहि क्षेत्रांत कार्यक्षम ठरावी, हें ध्येय आपणांस शास्त्रीय ज्ञानाचे मदतीने साधतां येईल. पण त्याला अनुभविक ज्ञान, आर्थिक मदत व अवधि या त्रयीची जरूर आहे.

याप्रमाणें संयोगाचें ध्येय ठरल्यानंतर लग्नपद्धति व वधूवरांची निवड त्यास अनुसरून केली पाहिजे. जनावरांचे बाबतींत फक्त कुलाचाच विचार करतां येणार आहे. तो करतांना साधारणपणे दोन्ही बाजूंच्या सहा पिढ्यांपर्यंत भाऊबंदकीचा संबंध विचारांत घ्यावा व अलीकडच्या दोन पिढ्यांना जास्त महत्त्व

ावें. म्हणजे वंशावळ व त्यांतील वंशजांचा एकंदर जीवनक्रम व त्यांचें कार्य टिपणांवरून काढावयास हवींत. आपल्याकडे जनावरांचीं टिपणें कोणीहि ठेवीत नाहीं, परंतु यांवरून जनावरांची योग्यता चांगली अजमावतां येईल व नंतर प्रत्यक्ष जनावराची शरीराची ठेवण व बांधा पाहून बरीचशी परीक्षा करतां येईल. हें परीक्षणशास्त्र फार कठिण असुन थोड्यांनाच पूर्णपणें अवगत आहे. यानंतर याच पिढींतील आप्तांची किंवा त्यांच्याच पूर्वीच्या संबंधांत दिसून आलेली कर्तबगारी पाहून निवड करतां येईल.

या सर्व माहितीचा प्रत्यक्ष उपयोग अनुभवाशिवाय शक्य नाही. वधूचे आईबाप वरसंशोधनाचे वेळीं आपली मुलगी बहुगुणसंपन्न असली म्हणजे 'तिला वाटचा चोरहि उचलून नेईल' असें अभिमानाने म्हणत असतात, परंतु कृतीने मात्र अनुरूप वराचीच योजना करतात. तद्वतच आपली गाय कितीहि उत्तम असली तरी तिची गर्भधारणा वाटच्या पोळाकडून न होतां निवड केलेल्या पोळाकडूनच होईल अशी खबरदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे. पुढील पिढी अधिक सुक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येक पालकावर आहे. याकरतां सरकारने नियम करून मालकाने तज्ज्ञांच्या सल्ल्याने या गोष्टी सनोंद करवल्या पाहिजेत असें ठरवावें.

आज हयात असलेल्या कुचकामी प्रजेचा नाश करणें हें भावनाप्रधान व धार्मिक लोकांना दुःसह होईल, परंतु किमानपक्षीं त्यांच्यांत संततिनियमन करवून पुढील प्रजा अक्षम निपजणार नाही अशी काळजी घेतली पाहिजे. यास्तव खच्ची करणें जोरांत चालू ठेवून गैरशिस्त प्रजोत्पादन थांबवणें आपलें आद्य कर्तव्य होय.

जननशास्त्राचे नियम साधारणपणे सर्व प्राण्यांना सारखेच लागू पडतात. जनावरांचीच काय पण मानवांचीहि सुधारणा याच मार्गाने होणार आहे. दोन्ही पक्षांकडील कुलांच्या दृष्टीने निवड अत्यवश्यक आहे, परंतु जनावरांचे बाबतींत वळूंनाच अधिक महत्त्व आहे आणि म्हणूनच त्यांची निवड फार महत्त्वाची

आहे. एखाद्या गायीचीं आयुष्यांत १०–१२ च वीतें होतील, परंतु एक वळू आयुष्यांत शेंकडों वेळां पिता होऊं शकतो. ही एकच गोष्ट त्याच्या जातीगोतीचें महत्त्व पटवते. यावरून गांवांत मोकळे सोडलेले पोळ किंवा प्रचारकांनी दिलेले पोळ या सर्व दृष्टींनी कितपत उपयोगी असतात याचा सर्वांनीच विचार करावा.

'जुनें तें सोनें,' 'योगायोग' 'धर्म, धर्म' म्हणून भलत्याच गोष्टींचें अवडंबर माजवून समाजाची आर्थिक अथवा नैतिक सुधारणा होणार नसून, शुद्ध तात्त्विक पायावर उभारलेल्या शास्त्रांची मदत घेऊन, सत्यधर्मास अनुसरूनच समाजाचें कल्याण होणार आहे. ॐ तत्सत्.

---

# जागृत देव

—:०:—

ले. **माधव खंडेराव बागल**, कोल्हापूर.

तालुक्याचें ठिकाण फार लांब नव्हतें, होतें चार पांच मैल. खेड्यांतल्या माणसांना एवढें अंतर म्हणजे कांहीच नाही, दिवसांतून सहज दोन खेपा व्हायच्या. नेहमी जाणेंयेणें असल्यामुळे तालुक्याच्या शहरांत पाटलांच्या पुष्कळ ओळखी झाल्या होत्या. पाटील दिसले म्हणजे कोणीतरी हांक मारून घरांत बोलावणार, पानतंबाखूचा तरी आग्रह करणार. गांवचे पाटील असल्यामुळे कचेरीत जाण्याचा नेहमी प्रसंग. शिपायांच्या, कारकुनांच्या ओळखी व्हायच्याच.

सहजीं शहरांतल्या एका पाहुण्याची गांठ घ्यावी आणि जमल्यास कारकुनालाबी कामाचें विचारावें म्हणुन पाटलांची स्वारी आज गावांबाहेर पडली होती. चालतां चालतां वाटेंत त्यांच्या पायतणाचे बंद तुटले, त्यामुळें त्यांना पायतण घालून मुळीच पाय पुढे टाकतां येईना. इकडे तिकडे बघून पाटलांनी आपल्या पटक्याच्या शेंबल्याचें टोंक जरासें फाडलें आणि त्यानें पायतण पायाशीं बांधून टाकलें. पटक्याचें कापड कितीवेळ टिकणार? कसेबसे गांवच्या नजीक

आले. आतां यापुढें असें फरफटत जाणें, आणि तेंहि बांधलेल्या चिंधुकल्यासकट, ओळखीचे लोक चेष्टा केल्याखेरीज राहणार नाहीत, म्हणून त्यानी तें काढून टाकलें. त्यापेक्षां अनवाणी चालणेंच बरें, अन् गांवांत काय कांटाकुटा लागणार होता थोडाच ?

पायतण काढून रस्त्याच्या बाजूला एका झाडाच्या बुंधाखाली टाकलें. एखाद्या वेळीं परत जातांना लागलेंच तर घ्यावें म्हणून तेथेच पडलेला एक दगड त्याच्यावर टाकला आणि ती जागा सांपडावी म्हणून पटक्याच्या फाटलेल्या शेंबत्यांत एक काठी घातली आणि ती जवळ दिली रोंवून.

गांवांत पाहुणेपैच्या गांठी घेतल्या, पण कारकुनाने नेहमीच्या रिवाजाप्रमाणें कामाचें लगेच कांही उत्तर दिलें नाही, त्यामुळे त्यांचा त्या दिवशीं तेथेच मुक्काम पडला. दुसरे दिवशी होता बाजार. हिंडतां हिंडतां त्यांना एक पायतणाचा जोड स्वस्त्यांत दिसल्याबरोबर त्यांनी लगेच खरेदी केला. नवा जोड मिळाल्यावर मग जुन्या पायतणाची काय जरूर ? त्याची त्यांना आठवणहि राहिली नाही.

पाटलांचे गांवांत एक मोठे देवभक्त दोस्त होते, त्यांचें नांव ज्ञानबा. ते माळकरीच होते, आणि बहुतेक वेळ भजनांत घालवीत. जाल त्या वेळी त्यांच्या हातांत टाळ हा दिसायचाच. सर्व कांही होत आहे तें देवाच्या इच्छेने होत आहे ही त्यांची ठाम समजूत. कर्ता करविता सर्व कांही तो आहे, आपण निमित्त मात्र आहोंत असें ते नेहमी बोलत. कोठें जायचें झालें, कांही करायचें झालें, कोणी आजारी पडलें, की ज्ञानबांनी आपला देव गांठायचा. कारण झाडाचें पान सुद्धा त्याच्या आज्ञेशिवाय हालत नाही, त्याचाच हुकूम चहुंकडे चालणार, चांगलें करणारा तो, वाईट करणारा तोच. त्याला शांत केला म्हणजे माणसाची काय भीति ? काळ सुद्धा त्याला भिऊन पळणार !

या त्यांच्या भाविकपणामुळे त्यांच्यापासून भटांभिक्षुकांना, जोश्यांना, गुरवांना, देवाचें नाव घेणाऱ्या सर्वांना, थोडातरी फायदा व्हायचाच. त्या लोकांनी

येऊन यांच्यापुढे देवाच्या चमत्कारांच्या, दृष्टांतांच्या गोष्टी सांगायच्या आणि यांनी मान डुलवीत ऐकायच्या. पाटीलहि ज्ञानबाकडे जाऊन बसायचे. ते इतके देवभक्त नसले तरी देवाला मानायचेच, अन् खेड्यांत देवाला मानीत नाही असा असणार तरी कोण ? देवाला न मानणारा माणूस म्हणजे सैतान. खेड्यांतले लोक त्याला जिता जाळतील. अगदीं जिवंत पुरतील आणि तें पुण्य समजतील !

आमचे ज्ञानबा नेहमी देवांच्या शोधांत. देव चांगला कोणचा, वाईट कोणचा, जागृत देवता कोणती, थंड कोणती, नवसाला लवकर कोण पावतो, याची ते नेहमी माहिती काढीत. आसपासच्या सगळ्या दऱ्याखोऱ्यांतले, अगदी आडवळचणीचे, अशा झाडून सगळ्या देवांचें ठावठिकाण ज्ञानबांना अचूक माहीत असायचें. त्यांची देवभक्ति शहरांतल्या सगळ्या भटांना, जोश्यांना, देवाच्या सगळ्या खास वारसदारांना माहीत झाली होती. कारण कांही अडचण आली कीं ज्ञानबा या सगळ्या दलालांची घरें धुंडणार !

पाटील एकाएकी तापाने पडले आणि तापाची कमान रोज चढतच चालली. पाटील म्हणजे ज्ञानबांचे अगदी जिगर दोस्त. त्यांच्यासाठी ज्ञानबा भटांची घरें धुंडूं लागले. त्यांतल्या एका भटाने त्यांना एका नवीन देवाचा चमत्कार सांगितला. प्रत्यक्ष अनुभवाचीच गोष्ट, आणि त्या गोष्टीला फार दिवसहि झाले नव्हते. ज्यांना अनुभव आला ती मंडळी आज त्या गांवांतच होती. एका मोठ्या सावकाराचा खटला चालला होता, तीसचाळीस हजारांचा दावा होता. त्याला काय बुद्धि झाली कोण जाणे, त्यांनी एका अप्रसिद्ध देवाला नवस केला. आश्चर्याची गोष्ट, त्यांना वाटलें नव्हतें की असल्या आडवळणीं, लोकांच्या अगदी दृष्टीआड, अशी जागृत देवता असेल ! पण ती त्यांच्या नवसाला पावली. तिच्या कृपेने खटल्याचा निकाल त्यांच्यासारखा झाला.

त्यांनी हे उपकार जाणून त्या देवासाठी पांचहजार रुपये खर्च करायचें ठरवलें. महिनाभर रोज ब्राह्मणभोजन द्यायचें ठरवलें, आणि सावकार स्वतः रोज देवदर्शनाला येत. तुम्हीहि त्याच देवाला नवस मागून घ्या, असा भटजींनी

ज्ञानबाला सल्ला दिला.

ज्ञानबा जातांना देवाला गेले तो वाटेंतच होता. देवासमोर एक तात्पुरता
मंडप उभा केला होता. सभोंवतालची जागा साफसूफ करून कोपऱ्यांत एक
दिवा लावला होता. देवाच्या अगदी जवळ एक लकडकोट उभा केला होता.
बाजूला तीर्थ देण्याकरतां एक ब्राह्मण बसला होता. लकडकोटाच्या आंत
ब्राह्मणाखेरीज कोणी जायचें नाही, आणि ब्राह्मण सुद्धा स्नान केल्याखेरीज
जायचा नाहीं. दक्षिणेचा हक्क ब्राह्मणांचाच असतो, परंतु सावकार ब्राह्मणेतर
असल्यामुळे व त्याच्याच पैशानें देऊळ उभारणार असल्यामुळे शूद्रांना कठड्या-
पर्यंत जाण्याचा हक्क ब्राह्मणांनी स्वखुषीने दिला होता. देवाचें माहात्म्य गांवभर
पसरल्यामुळे सकाळ संध्याकाळ बायकापुरुषांची दाटी व्हायची !

पाटलांना बरें वाटल्यावर ब्राह्मणांना मोठे भोजन देऊं व देवळासाठी भर
म्हणून पंचवीस रुपये देऊं असें ज्ञानबाने कबूल केलें. त्याच वेळीं भटाच्या हाता-
वर एक रुपया दक्षिणा ठेवली आणि भक्तिभावाने देवाला साष्टांग नमस्कार घालून
ज्ञानबा आपल्या वाटेला लागले. त्यांनी पाटलांना सर्व हकीकत सांगितली आणि
आधार दिला. 'तुम्ही आता कांही काळजी करूं नका. सगळ्या भटांनी या
देवाची खात्री दिली आहे, तसा अनुभवच आला आहे.'

पाटलांचा ताप हळूहळू उतरूं लागला. वीस दिवसांनी तो साफ उतरला.
पाटलांनाहि वाटलें, ज्ञानबाचा देव खरेंच पावला, ज्ञानबाचे डोंगराएवढे उपकार
झाले. चालतां आल्याबरोबर त्यांनी प्रथम जाऊन देवाचा नवस फेडायचें ठरवलें.
ज्ञानबाची गांठ पडल्यावर ते पाटलाला म्हणाले, 'कां, आहे की नाही देवाचें
माहात्म्य ? खोटें व्हायचेंच नाही. भटांनी कांही उगीच खात्री दिली नव्हती !'
आषाढी आली म्हणून ज्ञानबा पंढरीला निघून गेले. जातांना पाटलाला देवाचा
ठावठिकाणा बरोबर सांगितला.

बरें वाटतांच पाटील देवदर्शनाला निघाले. ज्ञानबांनी सांगितलेल्या ठिका-
णावर देव सापडायला त्यांना वेळ लागला नाही. अगदी दुपारीच तेथे

पोंचल्यामुळें गांवचीं माणसें तेथे नव्हतीं. चारपांच ब्राह्मण मात्र होते. मंडप कच्चाच पण ऐसपैस होता. देऊळ बांधण्यासाठी दगड येऊन पडले होते, कांहीं घडकामहि झालें होतें. मुहूर्त पाहून पायाचा दगड बसवण्याचा समारंभ व्हायचा होता. पाटील मंडपांत गेले, आंत देवाजवळ गेले, कठड्याच्या आंत जाण्याची बंदी होती, पण ते तेथूनच मूर्ति निरखून पाहूं लागले. तेथे मूर्ति वगैरे कांही नव्हतें. एक वाटोळा दगड होता, अन् त्याच्यावर काठीला लावलेलें एक तांबडें निशाण होतें. तें पाहतांच त्यांना झटकन् एका गोष्टीची आठवण झाली आणि ते मोठमोठ्याने हसूं लागले.

तें तांबडें निशाण म्हणजे त्यांच्याच पटक्याची चिंधी फाडून त्यांनी उभें केलेलें निशाण होतें, आणि तो देव म्हणजे त्यांनीच आपलें तुटकें पायतण झाकून ठेवण्याकरता त्यावर उचलुन ठेवलेला दगड. तें चिंधीचें निशाण पाहून सावकार त्या दगडाला देव समजुन पायां पडला असावा, हें त्यांनी लगेच ताडलें आणि ते सारखे हसूं लागले. कांही केल्या थांबेनात.

तेव्हा पुजारी त्यांच्यावर संतापून म्हणाले, 'तुम्ही देवाची चेष्टा करतां काय, तुम्हाला पश्चात्ताप होईल! ही इतरांसारखी देवता नाहीं बरें, महा उग्र आहे!' 'अहो भटजी महाराज, तुम्ही नका मला ही भीति दाखवूं. ही देवता माझ्या चांगल्या ओळखीची आहे. महाराज, तुम्ही माझ्याच पायतणाची लागलां पूजा करायला! तो दगड मींच उचलुन माझ्या पायतणावर ठेवला, तो उचला म्हणजे खालीं माझें पायतण सांपडेल. त्याला तुम्ही देव करून टाकला आहे की!'

हें ऐकून भटांच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांनी पाटलांचे पाय धरून विनवणी केली, 'पाटीलबाबा, आता तुम्ही या गोष्टीचा बभ्रा करून आमच्या पोटावर पाय आणूं नका. आमच्यावर दया करा. हे घ्या पन्नास रुपये आणि जा कसे मुकाट्याने! भटांच्या पोटावर कशाला पाय द्यावा, म्हणून ते पन्नास रुपये घेवून निघून गेले. ज्ञानबा पंढरीहून परत आल्याबरोबर त्यांनी ती रकम ज्ञानबाच्या हातावर ठेवून, हा घ्या तुमच्या देवाचा प्रसाद म्हणून सर्व

हकीकत त्यांना सांगितली. ज्ञानबाहि पोट धरधरून हंसूं लागले. ते पंढरीहून बडव्यांच्या लाथा खाऊन आलेच होते, ते म्हणाले, पाटील, मला तर आता वाटतें जेथे तेथे असाच प्रकार असेल बघा. पंढरीला सुद्धा हेंच. देव पुढे करून बडव्यांनी पैसे उकळायचे, आणि त्यासाठींच ज्या त्या देवाचें महात्म्य वाढवायचें. खरा देव दगडांत नाही म्हणतात तें खरें नाहीतर काय !

---

**अद्‌भुत बातमी.** तिंबक्टु शहरांत एका मांजरीला तीन पोरें झालीं, त्यांतील एक हुबेहुब माणसासारखें, दुसरें सापासारखें, आणि तिसरें पोपटासारखें होतें ! ही बातमी आमच्या खास बातमीदाराकडून आलेली असल्यामुळे अजून दुसऱ्या कोणालाहि माहीत नाही. इतर पत्रांनी वाटल्यास प्रसिद्ध करावी.

---

**मदतः**—आमचे खटल्याचे खर्चास मदत म्हणून गुजराथी **समाजस्वास्थ्या**च्या एका वाचकाने रु. २५ दिले आहेत. एकूण मदतः रु. २३८-१२-६.
खटल्याचा एकंदर खर्च रु. ३६८-८-०

---

# पत्रव्यवहार

—×—

१.

वि. वि....मी एक उच्च मराठा कुळांत जन्मलो असून हल्लीं कालेजमध्यें आहें. जवळ जवळ मला १६ ते १८ वर्षें पर्यंत स्वसंभोगाची संवय होती. ती अजूनहि आहे. मी फार उद्दीपनशील आहे, माझ्याने फारसें राहावत नाही. शिवाय परिक्षेच्या वेळेस माझ्या मनावर धोंड दिल्याप्रमाणें होतें व नेहमी मी उदास दिसतों, कोणत्याहि कामांत लक्ष लागत नाहीं....याकरतां मला एक वर्ष फुकट गमवावें लागलें. शिवाय माझी प्रामाणिक समजूत अशी

आहे की विवाहाच्या पूर्वी सहवास किंवा संभोग पाप आहे आणखी हल्ली का खाजगी अडचणींमुळें माझें लग्न होणें शक्य नाहीं. ह्या वर्षी माझ्यानें अभ्या मुळीच होत नाही, तरी मी काय करावें? असें आपलें मतें आहे? आपला...

उ. उपाशीं राहून भूक भागवण्याची युक्ति अजून निघालेली नाही निघाल्याबरोबर ताबडतोब प्रसिद्ध करूं. **सं.**

२.

वि. वि. जुलै महिन्याच्या अंकांत आपण एका पत्राला उत्तर देतांना समागमास सकाळची वेळ चांगली असें म्हटलें आहे. समागमानंतर येणा थकवा तात्पुरता असला तरी त्यानंतर झोंप लागणें हें कित्येकांस जास्त बरे वाटतें. इतकेंच नव्हे तर मेरी स्टोप्स् वगैरे लेखकांचा रोख रात्रीचीच वेळ जास्त सुखावह आहे, असें म्हणण्याकडे दिसून येतो. जुन्या वैद्यकीय ग्रंथांत रात्रीच्या वेळेसंबंधीच शिफारस केलेली आढळते. ( त्यास किती महत्व द्यावयाचे ही गोष्ट वेगळी ). तरी यासंबंधी जास्त खुलासा करावा.

**सी. वि. केळकर.**

**उ.** रिकामटेकड्या लोकांची गोष्ट वेगळी, परंतु ज्यांना भरपूर काम करावे लागतें असे लोक रात्री थकलेले असतात हें उघड आहे. शिवाय रात्री जेवणा मुळेहि थोडेंबहुत जडत्व येतें. त्यांतच आणखी समागमापासून येणाऱ्या थकव्याची भर घालणें इष्ट दिसत नाही, आणि समागमाचे वेळी मनांत जो उत्साह आणि जी प्रफुल्लता असणें सर्व दृष्टींनी इष्ट दिसतें, ती रात्री असणें संभवनीय दिसत नाही. उलटपक्षीं रात्रभर झोपून मनुष्य सकाळी ताजातवाना होतो, तेव्हा सकाळचीच वेळ आम्हास बरी दिसते. थकवा आल्यास थोडा वेळ पडून रहावें म्हणजे झालें. नियमित व्यायाम करणारे बरेच लोक व्यायामाकरता सकाळचीच वेळ नाही का पसंत करीत? इतकें असूनहि बरेच लोक समागमाकरता रात्रीचीच वेळ पसंत करतात याचें कारण इतकेंच की पुष्कळ लोकांस रात्रीशिवाय स्वस्थ-पणा असा सांपडतच नाही, तेव्हां निवांत वेळ म्हणून ही बरी वाटते. सकाळी

पुष्कळ लोकांस लवकर उठावें लागतें, तेव्हा दुसरे कांहीं सुचणें शक्य नसतें, परंतु तात्त्विकदृष्ट्या सकाळचीच वेळ समागमास चांगली, शक्याशक्यतेचा प्रश्न ज्याचा त्याने पहावा, असें आमचें निश्चित मत आहे, आणि कित्येक तज्ज्ञांनीहि असें मत दिलेलें आहे. **सं.**

**३.**

वि. वि. आपल्या मासिकाच्या आगष्टच्या अंकांत 'थोडक्यांत चुकलें' या मथळ्याची **गी द मोपॅसां**वरून घेतलेली गोष्ट दिली आहे. समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने सदर गोष्टीचें महत्व काय आहे हें माझ्या लक्षांत आलें नाही. स्त्रीपुरुषांचे विवाहबाह्य संबंध प्रेमाचे असल्यास त्यांत गैर नाही असें मत आपण प्रतिपादीत आहांच, त्याकरता गोष्ट नको. नग्न अंग परपुरुषाला दाखविण्याला **मॅरोका** लाजली व पुढे तिची दोस्ती जमल्यावर ती त्याचे पुढ्यांत विवस्त्र फिरूं लागली यांतही विशेष कांही नाही. गोष्टीचें तत्त्व शेवटच्या प्याऱ्यांत आहे. याराचा जीव वांचविण्यासाठीं प्रसंग आल्यास आपल्या नवऱ्याचा खून पाडण्यासही मागेंपुढें पाहणारी ती नव्हती, कुऱ्हाडही तिने जवळ आणून ठेवली होती असें दाखवलें आहे. एकंदरींत स्त्रिया 'साहसी' असतात हेंच या गोष्टीचें रहस्य. असल्या गोष्टीकरितां **गी द मोपॅसां**कडे धाव घेण्यास नको. आमच्या पहिल्या वाङ्मयांत स्त्रीचरित्रावर किती तरी ग्रंथ झाले असून त्यांतील कोणतीही गोष्ट **गी द मोपॅसां**च्या गोष्टीस मागें सारील. ही गोष्ट **समाजस्वास्थ्य** मासिकाच्या ध्येयाला पोषक नसून उलटी बाधक आहे असें आमचें मत आहे. असल्या गोष्टीची आमच्यासारखे अपेक्षा करीत नाहीत. आपला **सिमला.**

**उ.** लघुकथा तत्त्वप्रतिपादनाकरता लिहिलेल्या असाव्या असें आमचें मत नाही. लघुकथा, नाटकें, कादंबऱ्या यांचा मुख्य उद्देश मनुष्यस्वभावाचें यथार्थ चित्र काढून त्यायोगें करमणुक करणें इतकाच असावा. तत्त्वप्रतिपादन केल्यास तें यथार्थ होत नाही आणि त्याने करमणूकहि होत नाही. गोष्टींत तत्त्वें घुसडल्याने त्या किती हास्यास्पद होतात याचें उत्कृष्ट उदाहरण 'विहंगम'

मासिकाच्या सप्टेंबरच्या अंकांत श्री. रं. कृ. चिंचलीकर, बी. ए. ( ऑनर्स ) यांच्या लेखांत सांपडेल. त्यांत एक हिंदु तरुण एका मुसलमान तरुणीचें चुंबन घेण्याकरता तिच्या तोंडाजवळ तोंड नेतो, तेव्हा 'त्याला आयुष्यांत कधींहि न आढळलेली असह्य दुर्गंधी आली' असें वर्णन आहे. गोष्टीच्या सुरवातीचें वाक्य 'त्या दोघांच्या संस्कृतींत गोरस व गोमांस इतकाच फरक होता.' असें आहे. यावरून गोमांस खाणारांच्या तोंडाला घाण घेते असें लेखकाचें म्हणणें दिसतें. या विलक्षण मताला कोणत्याहि प्रकारचा आधार नाही. हे गृहस्थ गोरक्षणप्रचारक असावेत असें अनुमान निघतें, परंतु हें विधान त्यांनी कां केलें ? एकतर गोरक्षणप्रचाराकरता खोटें विधान करण्यास हरकत नाही असें त्यांचें मत असावें, किंवा गोमांसाने तोंडाला घाण येते अशी त्यांची खरोखरच कल्पना असावी. ही कल्पना होण्यास तरी, एक तर त्यांनी मुसलमान तरुणीचें चुंबन घेण्याचा प्रयत्न कधीहि केला नसून ही दुर्गंधि केवळ त्यांच्या डोक्यांतूनच आली असावी, किंवा तसा प्रयत्न करून त्यांना घाण आली असावी. तशी आली असली तरी देखील, जैन, बौद्ध व हिंदु लोकांखेरीज इतरांच्या तोंडाला घाण येते, व यांच्या मात्र येत नाही, ही कल्पना किती पोरकट आहे, हें 'बी. ए. ऑनर्स' वाल्या लेखकाला तर दिसलें नाहीच, पण या कल्पनेवर बसवलेली गोष्ट प्रसिद्ध करणारे संपादकहि त्यांना भेटले ! तोंडाला असह्य घाण येणारे हिंदु अनेकांच्या माहितींत असतील, व सर्वंच गोमांस खाणारांच्या तोंडाला जर घाण येत असती तर हिंदूंशीं मुसलमानांची लग्नें झालेलीं कधीकधी दिसतात तीं दिसलीं नसतीं. अशा हास्यास्पद गोष्टी प्रसिद्ध करण्याची आमची मुळीच इच्छा नाही. आम्ही लघुकथाच प्रसिद्ध करूं नये असें कांहींस वाटण्याचा संभव आहे, परंतु आमचे मतें करमणुकीस हरकत नाही. जुन्या वाङ्मयांत चांगल्या गोष्टी आहेत हें खरें आहे, म्हणून इतर वाङ्मयांतून नवीन घेऊं नयेत असें होत नाही. लघुकथांचा जन्मच फ्रेंच वाङ्मयांत आहे व **गी द मोपसां** हा त्यांतही नांवाजलेला लेखक आहे, म्हणूनच आम्ही त्याच्या गोष्टी घेतों. आता मनुष्यस्वभावाचें यथार्थ दिग्दर्शन केल्यास त्यांतून कांही धडे घेतां



289540.

येणार नाहीत असें मात्र नाही, परंतु नीतिनियम पूर्वनिश्चित असल्यास त्यांशीं ते जुळणार नाहीत. नीतिनियमांबरहुकूम 'मनुष्यस्वभाव बदलणें-शक्य नाही, परंतु नीतिनियम मात्र मनुष्यस्वभावाप्रमाणे बसवतां येतील. उदाहरणार्थ आपण आक्षेप घेतलेली गोष्ट पाहिल्यास तींत असें दाखवलें आहे की कांही स्त्रियांस एकाच वेळीं दोन पुरुषांवर प्रेम करणें स्वाभाविक असतें. असें झाल्यास कांही स्त्रिया सामाजिक नियमांमुळे परपुरुषावरील प्रेम दिसूं देणार नाहीत, पण तें त्यांच्या मनांत राहीलच व त्याचे अनिष्ट परिणाम होतीलच. कांही स्त्रिया नीतिनियमांस भीक न घालतां व्यभिचार करतील. आता पुष्कळ देशांत अशी रीतच पडली आहे की स्त्रीचा व्यभिचार उघडकीस आल्यास नवऱ्याने खुशाल तिचा व तिच्या याराचा खून करावा आणि न्यायाधीशांनी ते खून माफ करावे. या परिस्थितीमुळे, उघडकीस येण्याचा प्रसंग आल्यावर स्वतःच्या व याराच्या बचावाकरता नवऱ्याचा खून करण्याची तयारी तिने केली. जिवावर बेतली म्हणजे कोणीहि साहसी होतो, तेव्हां स्त्रिया 'साहसी' असतात असें दाखवण्याचा उद्देश या गोष्टीचा नाही. पुरुष पुष्कळ वेळां याहीपेक्षा क्षुल्लक कारणाकरता खून करतात, तेहि साहसीच असतात, परंतु वरील गोष्टींत केवळ स्वसंरक्षणाकरता तयारी होती. जुन्या वाङ्मयांतील गोष्टी पुष्कळ वेळां स्त्रियांच्या अंगीं बळेंच चिकटवलेले गुण 'अनृतं साहसं माया' वगैरे सिद्ध करण्याकरता लिहिलेल्या असतात, परंतु ही गोष्ट जास्त नैसर्गिक दिसते. हे गुण जर स्त्रियांचे अंगीं पुरुषांपेक्षा जास्त प्रमाणांत दिसले तर ते परिस्थितीमुळे उत्पन्न झालेले आहेत, तो स्त्रीपुरुषांतील नैसर्गिक भेद नाही, असें आमचें मत भरपूर पुराव्यावर उभारलेलें आहे. तेव्हा वरील गोष्ट आमचे ध्येयास बाधक होते असें वाटत नाही. **सं.**

४.

वि. वि. १. स्त्री प्रसूत होऊन किती दिवसांनंतर ती समागमास योग्य होते ?......२. मी कांही लोकांच्या तोंडून ऐकलें की ज्या स्त्रीचे स्तन लहान

असतात तिचा योनिमार्ग ( लांबी ) लहान असतो, उलटपक्षीं जिचे स्तन मो असतात तिचा मोठा असतो, हें खरें काय ? ३. स्त्रियांचें सौंदर्य खुलून दिसण्या लहान स्तन चांगले की मोठे ? समागमाच्या वेळेस स्तनांचा कमी जास्त उपयो करण्यावर स्तनांचा आकार अवलंबून असतो काय ? आपला...

उ. १. 'आधुनिक कामशास्त्र' पहा. २. असा नियम नाही. ३. सौंदर्य बद्दल बराच मतभेद असतो, तथापि स्तन लहान किंवा मोठे नसून प्रमाणां असावे हें उघड आहे. त्यांचा आकार बहुतांशीं अंतःस्रावग्रंथींवर अवलंबतो. सं

५.

वि. वि. १. आमच्या एका मित्राच्या बायकोचें वय १८ व १९ च्या मधें आहे, उंची ५ फूट आहे. अद्याप ऋतुप्राप्ति झाली नाही. ऋतुप्राप्तीची वयो मर्यादा कमाल किती असते ? आमच्या मित्रपत्नीच्या जननेंद्रियावर अद्याप केशो द्भव नाही, उरोज सुपारीएवढाले सुद्धा नाहीत. ऋतुप्राप्ति होणें शक्य आहे काय अर्धनारी म्हणून जो स्त्रियांचा वर्ग असतो त्या कोटींत आमची मित्रसौभाग्यवती बसणार की काय ? इंद्रियप्रवेश होत नाही. शरीर कृश आहे. सामान्य श्रमानें काम करतांना दम लागून घरघर सुरू होते. याचा ऋतुप्राप्तीशीं संबंध आहे की काय ? २. आमचे मित्र पत्नीस सोडचिठ्ठी देवूं इच्छितात, परंतु त्यांचे सासरे घेण्यास तयार नाहीत कारण सासऱ्यांस गुप्त माहिती नाही. करितां या कारणांच्या बाबतींत पत्नीस सोडचिठ्ठी देतां येईल असा कायद्याचा आधार आहे काय ? आ......

उ. १. वाढ पुरी झाली नाही ही अंतःस्रावग्रंथींची कमतरता असावी, त्यावर उपचार करणें शक्य आहे. दम लागतो याचा त्याशीं संबंध दिसत नाही. चांगल्या डॉक्टरास दाखवावें, बाकी दम्यावर फारसे यशस्वी उपाय बऱ्याच खट पटीशिवाय सांपडत नाहीत. सामान्यतः १८ वर्षांपर्यंत ऋतुप्राप्ति होते परंतु ती ३५ वर्षेपर्यंतहि न झाल्याचीं उदाहरणें आहेत. २. सोडचिठ्ठी देतां येईलसें वाटत नाही. पोटगी देऊन बायकोला वेगळी ठेवण्याचा हक्क प्रत्येक हिंदु नवऱ्याला

असतो. परंतु रत्नागिरी जिल्ह्यांत नुकतीच अशी एक हकीकत घडली की स्त्रीला योनिमार्गच नाही असें विवाहानंतर दिसून आल्यामुळे नवऱ्यानें बापावर फसवणुकीबद्दल फिर्याद करून विवाह रद्द करावा असा अर्ज केला. त्याचें कांहीं न चालतां कोर्टाने तिला नवऱ्याकडून पोटगी देववली. **सं.**

---

**डॉ. श्री. कमलाबाई देशपांडे,** कार्याध्यक्ष अनाथबालिकाश्रम भाऊबीज भेटमंडळ यांनी पुढील विनंति प्रसिद्धीकरतां पाठवली आहे ( संक्षिप्त ) कै. सर विठ्ठलदास ठाकरसी यांनी महिलाविद्यापीठास दिलेल्या १५ लाखांच्या देणगीचें व्याज चालू सालीं बंद झाल्यामुळे विद्यापीठाकडून मिळणारी वार्षिक मदत यंदा बंद होणार असल्याने पुढचें वर्ष संस्थेस कठीण जाणार आहे. तेव्हा स्त्रीशिक्षणाबद्दल कळकळ बाळगणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांनी आपली '**ओवाळणी**' स्वयंसेवकाजवळ देऊन पावती घ्यावी किंवा **हिंगणें बुद्रुक, पुणें नं. ४,** या पत्त्यावर पाठवावी.

---

# शारदेचें पत्र

——:*०*:——

परवां 'प्राविण्य' मासिकाचा एक अंक प्रथमच हातीं पडला. मला वाटलें मला भ्रम तर झाला नाही ? या शब्दांत 'वी' दीर्घ असली पाहिजे असें मला वाटलें, पण मासिकाच्या संपादकांत कोणी बी. ए., कोणी बी. ए., एल्. एल्. बी., कोणी बी. ए., बी. टी. असें असून अशी चूक करतील कशी, असेंहि वाटलें. बरें नजरचूक म्हणावी तर ती ४ थ्या वर्षाच्या ११ व्या अंकापर्यंत कशी शिल्लक राहील ? शेवटी आपट्यांचा कोश काढून पाहिला. त्यांतहि माझ्यासारखेंच निघालें. तेव्हां या प्रवीण संपादकांनी संस्कृतांत नवीन शोध लावले आहेत असें वाटलें. पुढें उलटून पाहतें तों ही चूक त्यांच्याहि लक्षांत आली असावी असें दिसलें, कारण आंतल्या पानावरील नांवाच्या खाली छापलेल्या 'दैवं निहत्य कुरू पौरुषमात्मशक्त्या' या ओळींत 'कुरु' ऐवजी 'कुरू' लिहून चुकीची भरपाई

केलेली दिसली. पुढे पाहतें तो स्त्रियांच्या आरोग्यावर एक लेख दिसला. याचे प्रवीण लेखक कशांत प्रवीण आहेत हें लेखावरून समजणें कठीण आहे, म्हणून बहुधा लेखकाने आपला अधिकार दाखवण्याकरता 'चालक शारदाप्रसुति-गृह, पुणें' असें आपलें वर्णन मथळ्यांत दिलें असावें. "प्रपंचांतील गाई म्हशी वगै अनेक उपयुक्त वस्तूंपेक्षां श्रेष्ठ म्हणजे 'प्रजोत्पादन व पाकसिद्धि' याच फ दोन गोष्टी स्त्रीवर्ग करूं लागला"...या वाक्यावरून त्यांच्या भाषेची कल्पन येईल. आणि जाहिरात जाड टाइपांतच बरी म्हणून पुढील वाक्य जा टाइपांत छापून त्यांनी आपल्या अज्ञानाची जाहिरात डोळ्यांत भरेल अ दिली आहे. पहाच त्यांची विद्वत्ता! "आरोग्याची हानी न होतां कोणत्याहि साधनांनी आज सशास्त्र संततिनियमन होत असेल तर तें स्वार्थी पुरुषवर्गाइतकें आजच्या आर्थिक अडचणीमुळे व स्त्रियांना आज खुल्या झालेल्या इत कार्यक्षेत्रामुळें स्त्रियांनाहि प्रिय होईल यांत शंकाच नाहीं. **परंतु संततिनियमनाचीं हल्लींचीं साधनें पहातां स्त्रियांचे आरोग्यावर हीं एक आकाशाची कुऱ्हाडच कोसळत असल्यामुळे बहुजनस्त्रीसमा जानें योग्य वेळींच या घातुक साधनांचा जोरानें प्रतिकार करणें अत्यावश्यक आहे."** या दिवसांत अशीं पोरकट विधानें करणें म्हणजे 'सूर्य दररोज उगवला असता तर एक बरें होतें, पण तो पहावा तर एक दिवसाआडच उगवतो' असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद आहे. या अज्ञानाल आज बिलकुल सबब नाही, कारण या अडाणी गृहस्थांना कदाचित इंग्र समजत नसलें तरी मराठींत संततिनियमनावर पहिलें पुस्तक प्रसिद्ध झाल्याल आज १० वर्षें झालीं, आणि तें वाचणाराला या बाबतींत बिलकुल शंका राहत कामा नये; अर्थात वेड पांघरणारांची गोष्टच वेगळी. आता असेंहि शक्य आ की प्रसूतिगृहाच्या धंद्याला संततिनियमन बाधक असल्यामुळे हे गृहस्थ स्त्रियां स्थितीबद्दल मोठा कळवळा आल्याचें ढोंग करून त्यांची जाणूनबुजून दिशाभूल करीत असतील, पण मी आरोपीला संशयाचा फायदा देऊन त्यांचें म्हणणे अज्ञानमूलक आहे असेंच धरून चालतें. तसें नसल्यास मात्र हे गृहस्थ वाटतात त्याहीपेक्षा भयंकर असले पाहिजेत.

नंतर नेहमीच्या शिष्टसंप्रदायाप्रमाणें, आमचे पूर्वज लोखंड खात होते, हल्लींच्या पिढीला भात देखील पचत नाही, अशा जातीचीं भरमसाट विधानें या आरोग्यप्रवीणांनी ठोकून दिलीं आहेत. अशीं विधानें स्वतःसिद्धच समजायची पद्धत आहे, तेव्हा त्यांना पुरावा काय करायचा! तीं भाषालंकार म्हणून जरूर तेथे घालायचीं! ते म्हणतात, पूर्वींच्या स्त्रियांना ३०–३५ वयापर्यंत ५–७ मुलें होवूनहि त्यांचें आरोग्य कोणतेंहि टॉनिक न घेतां उत्कृष्ट रहात असे. वांत्या होणें...वगैरे तक्रारी गरोदरपणांत क्वचितच होत व...अकालीं गर्भपात फारच विरळा घडत...बाळंतपण म्हणजे कोणीकडच्या कोणीकडे अत्यंत अल्पावधींत होत असे. बाळंतपणांत भरपूर तूप मिळून तेलमर्दनामुळे व शेक शेगडीमुळें तीन महिन्यांत बाळंतिणींचें पुनरुज्जीवन होऊन नेहमींच्या गृहकृत्यास ती यथायोग्य होत असे...आज धड ना नवे, ना जुने, अशा अर्धवट धेडगुजरी पद्धतीमुळें स्त्रिया एक दोन बाळंतपणांतच हल्लीं खची होत आहेत.' या सर्व विधानांना काडीचाहि आधार नाही. पूर्वीं बाळंतपणांत शेंकडा किती मरत असत व किती व काय प्रमाणांत रोगी होत असत यासंबंधी आंकडेच नसल्यामुळे वाटेल त्याने वाटेल तें बरळावें. जुन्या पिढींतले जे लोक तरुणपणीं किंवा लहानपणीं मेले, ते अर्थात् नव्या पिढीला दिसतच नाहींत. जे दिसतात ते म्हातारे झालेले असतात, यामुळे जुन्या पिढींतील सर्व लोक म्हातारपणापर्यंत जगत असें समजायाचें काय? तशीच बाळंतपणाची गोष्ट आहे. तीन महिने अंधारकोठडींत काढणाऱ्या बायकांची प्रकृति हल्लीपेक्षा अधिक चांगली रहात असे या म्हणण्यांत अर्थ नाही. आणि तूप हें सर्वांत उत्तम अन्न हेंहि हल्ली कोणी कबूल करणार नाही. शेवटीं हे प्रवीण गृहस्थ महत्त्वाचा उपदेश करतात की 'करायचें तर पूर्वपरंपरेने चालत आलेलें जुनें तरी करा, नाही तर पाश्चात्य शास्त्राप्रमाणे पूर्ण नवें तरी करा!' पूर्ण जुनें आणि पूर्ण नवें हीं दोन अगदीं तंतोतंत सारख्याच किमतीचीं आहेत असें लेखकाचें मत दिसतें, एरवी त्यांनी त्यांतल्या त्यांत चांगलें कोणतें हें सांगितलें असतें. हा प्रवीण लेखकाचा मासला कसा काय वाटतो तुला?

बेहरे इतके नीतिबाज आहेत अशी माझी कल्पना नव्हती, पण 'सुबोध' च्या गेल्या अंकांत त्यांनी 'कला व नीति' वर जे काय तारे तोडले आहेत म्हणतेस! त्यांच्याजवळ मतभेदाला देखील जागा नाही. त्यांचें म्हणणें ज्यांना कबूल असेल तेच कलावंत असूं शकतात, बाकीचे कलाहीन. ते म्हणतील तोच धर्म, ते म्हणतील तीच नीति, आणि ते म्हणतील तीच कला. बाकीच्यांनी आपली अक्कल जणूं काय गहाण टाकली आहे! धर्म व नीति बदलतात हें त्यांना कबूल आहे. 'पण धर्मांचीं मूलतत्त्वें अचल आहेत व त्यांची सत्यता चिरंतन टिकणारी आहे.' येथपर्यंतच जर ते थांबले असते तर ठीक होतें. कारण असलीं विधानें कधी खोडणेंच शक्य नसतें. पण हीं तत्त्वें काय आहेत हें ते सांगायला गेले तेथे ते घसरले. 'सत्य, अहिंसा व ज्ञान हीं तत्त्वें सर्व धर्मांना सर्व कालीं मान्य असतात. काळ बदलला तरी तीं बदलत नाहीत. त्यांचें अस्तित्व व अनंतत्व स्थलकालनिरपेक्ष असतें.' धर्माच्या नांवावर कोणतींहि धडधडीत खोटीं विधानें केलीं तरी तीं पचतात अशी त्यांची कल्पना दिसते. की ही विधानें खोटीं आहेत हेंहि न समजण्याइतके ते आंधळे झाले आहेत! अहिंसेचें तत्व फारच थोड्या धर्मांना कबूल आहे, आणि हिंदुधर्माला तर तें मुळींच कबूल नाही. बेहरे स्वतःला हिंदु म्हणवीत असल्यास त्यांना हें माहित असायला पाहिजे. हिंदु धर्मांत यज्ञ आहे, यज्ञपशूंची हत्या आहे, वैदिक धर्मांत गोवध देखील आहे. 'तो हल्ली नाही' म्हणून भागणार नाही, कारण बेहऱ्याचीं धर्मतत्वें स्थलकालनिरपेक्ष आहेत. आणि पुढे लगेच हे विद्वान गीतेंत शिरतात, पण त्यांच्या हें लक्षांत रहात नाही की गीतेंत संहार करण्याचा उपदेश केला आहे, अहिंसेचा नव्हे! ही अहिंसेची गोष्ट झाली. ज्ञानाचें आणि धर्माचें तर नेहमीच वांकडें असतें, कारण धर्मतत्वांबद्दल शंका घेणें हेंच पाप असतें, आणि जो शंकाच घेत नाही त्याला ज्ञान कसें मिळणार? सत्य आणि ज्ञान यांत फरक नाही, कारण ज्ञान म्हणजे सत्याचेंच ज्ञान, कारण ज्याचें ज्ञान नाही त्या सत्याचा काय उपयोग आणि तें सत्यच कशावरून? बेहरे म्हणतात 'सत्यं शिवं सुंदरम्' हें कलेचें स्वरूप होय. इतकें खोटें विधान दुसरें सापडणें कठिण. सौंदर्याशिवाय

इतर भानगडींचा कलेशीं बिलकूल संबंध पोचत नाही. सत्याचा आणि सौंदर्याचा काडीइतका संबंध नाही आणि बेहरे, तांबे किंवा आणखी कोणी-कांहीहि म्हटलें तरी देखील नाही. 'शिवं' हें तर कलेपासून जास्तच लांब आहे. आपलें म्हणणें प्रस्थापित करण्याकरतां बेहरे जीं उदाहरणें देतात, त्यांनी दुसऱ्या कोणाची खात्री कशी व्हावी? ते म्हणतात, 'सिंधूचें पात्र पाहून दारुबाजीच्या नशेंत आपल्या साध्वी पत्नीला छळून ठार मारण्याची इच्छा अट्टल दारुड्याला देखील होणार नाही. मृच्छकटिक पाहिल्याने प्रत्येक क्रांतिकारकाला वसंतसेनेसारखें किंवा मदनिकेप्रमाणे एकेक पात्र ठेवण्याची गरज भासत नाही.' यांत क्रांतिकारक कशाला आले, हा प्रश्न सोडून दिला तरी देखील याचा अर्थ समजणें कठिण आहे, 'एकच प्याला' ज्याप्रमाणे दारुबाजीचे भयंकर परिणाम दाखवण्याकरता लिहिलेलें आहे, त्याप्रमाणे मृच्छकटिकांत रंडीबाजीचे दुष्परिणाम दाखवले आहेत असें त्यांचें म्हणणें आहे काय? ते जी भाषा वापरतात त्यावरून वसंतसेना हें एक चारुदत्ताने ठेवलेलें पात्र आहे अशी त्यांची कल्पना दिसते. आपण कवि आहोंत असा बेहऱ्यांचा आग्रह आहे, तेव्हां त्यांना काव्य समजत नाही असें कसें होईल? परंतु मृच्छकटिकाचा हा उद्देश लेखकाच्या मनांत होता असें वाटत नाही आणि रसिक वाचकांच्या वा प्रेक्षकांच्या मनावर तर तसा परिणाम खास होत नाही. एकच प्याल्यांत नीतीचा धडा शिकवण्याचा प्रयत्न केला आहे, तेव्हां त्या नाटकाला कला म्हणायचें असल्यास कलेचा आणि नीतीचा संबंध जोडतां येईल, पण मृच्छकटिकांत नीतीचे धडे नसून दैवगतीचें चित्र आहे, आणि म्हणूनच तें एकचप्याल्यापेक्षा कितीतरी सरस आहे. त्यांत विवाहित मनुष्याचें प्रेम कलावंतिणीवर असलेलें दाखवलें आहे, तेव्हां प्रचलित नीतीशीं तें विसंगत आहे, आणि तरीदेखील ती कला आहे. चारुदत्ताला त्यामुळे कोणताहि कमीपणा आलेला नाही, तेव्हा कलेची आणि नीतीची सांगड घालण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. तसें म्हणायचेंच असेल तर म्हणा, पण ज्याचा पुरावा करूं लागतांच फजीति होते, तें सत्य कोण म्हणेल? तो दुराग्रह आहे.

तुझी शारदा.